वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शनिवार दि. ८ फेब्रुवारी २०२५ पाने ४ किंमत ३



# आ.संदीप क्षीरसागरांकडून बंधारा कम पुल जागेची पाहणी

## तेलगाव नाका येथे पाण्याची नविन पाईपलाईन योजनेचा शुभारंभ



### शाहूनगर येथील रस्ता कामासह विविध ठिकाणच्या विकास कामांची केली पाहणी

बीड , (दिव्य न्युज):- बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी मतदार संघातील विकास कामांचा समतोल कायम ठेवला आहे मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्षात सुरू झालेली विकासकामे गतीने पुढे सरकावीत यासाठी स्वत: उभा राहून आमदार संदीप भैया लक्ष देत आहेत. शनिवारी (दि.८) सकाळी बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रात बंधारा कम पुल होत असलेल्या जागेची त्यांनी पाहणी केली. तसेच तेलगाव नाका येथे पाण्याच्या नविन पाईपलाईन योजनेचा शुभारंभ आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आला.

Email:- dailydivyawarta@Gmail.com

दिव्य वार्ता

Email:-editordivyawarta@gmail.com

बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रात बंधारा कम पुल होत आहे.या जागेची आ.संदीप क्षीरसागरांकडून पाहणी करण्यात आली. लवकरच या कामाला प्रत्यक्ष सुरूवात देखील होणार आहे. काम सुरू होण्यासाठी आवश्यक असलेल्या तपासणी व चाचण्या घेण्याचे काम सुरू आहे अशी माहिती यावेळी त्यांनी दिली.

बीड शहरातील तेलगाव नाका येथे पाण्याची नविन पाईपलाईन योजनेचा शुभारंभ आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्यांनी परिसरात सूरु असलेल्या रस्ता कामांची पाहणी केली. याबरोबरच बीड शहरातील प्रभाग क्र.२२ मधील कै.शिवाजी धांडे नगर भागातील मुख्य नाल्याची पाहणी करून नाल्याचे काम तातडीने सुरू करण्याबाबत आ.संदीप भैय्यानी संबंधित यंत्रणेस निर्देश दिले. तसेच या परिसरात सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी देखील

▶▶ पान २ वर

# आ.नमिता मुंदडा यांच्या निवडीला आव्हान खंडपीठात निवडणूक याचिका दाखल

## पृथ्वीराज साठे यांची खंडपीठात निवडणुक याचिका दाखल

बीड, (दिव्य न्युज):- केजच्या आ. नमिता मुंदडा यांच्या निवडीला आव्हान देणाऱ्या निवडणूक याचिकेत मुंदडा यांच्यासह सर्व उमेदवार व निवडणूक आयोगास नोटीस बजावण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती अरुण पेडणेकर यांनी दिले.

नमिता मुंदडा या भाजपकडून विजयी झाल्या आहेत. त्यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांनी निवडणूक लढविली होती. पराभव झाल्यानंतर साठे यांनी खंडपीठात निवडणूक याचिका दाखल केली.जिल्हा





निवडणूक अधिकाऱ्यांना मागणी करूनही फॉर्म १७ सीची प्रत त्यांनी दिली नाही. त्याचप्रमाणे निवडणूक प्रक्रियेची केलेली व्हिडीओ शूटिंग, सीसीटीव्ही फुटेज मागणी करूनही दिले नाही. निवडणूक अधिकाऱ्यांनी विजयी उमेदवाराला झुकते माप दिले. केज विधानसभा मतदारसंघासाठी निवडणूक आयोगाने कुठलेही

▶▶ पान २ वर

# मांजरसुंब्याजवळ अपघात

## दोन ठार, दोन गंभीर



बीड, (दिव्य न्युज):- जिल्ह्यात अपघाताची मालिका सुरूच असून शुक्रवारी केजजवळ दोघांचा मृत्यू झाल्याची बातमी ताजी असतानाच रात्री बारा वाजण्याच्या सुमारास मांजरसुंबा जवळील मुळूकवाडी येथे देव दर्शन करून परत येत असताना दोन वाहनाची धडक झाली. यामध्ये दोघांचा मृत्यू झाला असून तीन गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे.

बीड जिल्ह्यात मागील काही दिवसात अपघाताच्या प्रमाणत वाढ झाली आहे.दिनाक ७ रोजी रात्री १२ वाजण्याच्या सुमारास अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंभा

# अल्पसंख्याक समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी कटिबद्ध

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आ.इंद्रीस नायकवडी यांना आश्वासन

पुणे, (दिव्य न्युज):- शुक्रवारी पुणे येथे दक्षिण महाराष्ट्राच्या विधानसभेच्या सर्व सदस्यांची विशेष सभा व बैठक पुण्यातील मध्यवर्ती सभागुहात झाली यावेळी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी विधानसभेच्या सर्व सदस्यांच्या कामगिरी व विकास कामा बाबत चा आढावा घेतला आमदार इंद्रीस नायकवडी यांनी दादा ना विनंती केली की त्याच बरोबर महाराष्ट्रातील अल्पसंख्याकांच्या समस्या सोडविण्यासाठी तातडीने पावले उचलावी अल्पसंख्याक समाजाचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावावे.ऊर्दु शिक्षक भरती . ऊर्दू शाळेला अनुदान तसेच टी ऐ टी चे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत ज्यामध्ये अल्पसंख्याकांचे विशेष प्रतिनिधीत्व देण्यात यावे.नायकवाडी यांनी विशेषत: उपमुख्यमंत्र्यांना ऊर्दू अकादमी.हज हाऊस .आणि वक्फ मालमत्तांच्या संरक्षणासाठी अल्पसंख्याक मंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली



सरकारी प्रतिनिधीची खात्री केली पाहिजे याची खात्री करण्यास सांगितले नंतर आ इंद्रीस नायकवडी म्हणाले की अजीतदादा पवार यांनी मी दिलेले सर्व सबमिशन काळजी पूर्वक वाचले आणि पुढील काही दिवासात त्यावर ठोस कारवाई योजना तयार करेल आणि अल्पसंख्यांकांना लवकरात लवकर प्रलंबित प्रश्न मार्गी लावु असे आश्वासन अजीत दादा यांनी दिले.

# पेठ बीड भागातील विजेच्या प्रश्नासंदर्भात सलीम जहाँगिर यांनी घेतली कार्यकारी अभियंत्यांची भेट

## कुचकामी तारा, पोल, ओव्हरलोड डीपी बदलण्याची मागणी

बीड , (दिव्य न्युज):-पेठ बीड भागात गेल्या काही महिन्यांपासून विजेचे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. ठिकठिकाणी विजेच्या तारा कुचकामी झाल्या असुन त्या लोंबकळत आहेत. यामुळे नागरीकांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. त्याचबरोबर ओव्हरलोड डीपीमुळे वारंवार वीज पुरवठा खंडीत होऊ लागला आहे. या प्रश्ना संदर्भात भाजप अल्पसंख्यांक प्रदेश महामंत्री ▶▶ पान २ वर



## लोणगाव येथे भररस्त्यात तरूणावर हल्ला

# डोळ्यात मिरची पावडर टाकून कात्रीनं सपासप वार

बीड, (दिव्य न्युज):- गेल्या काही दिवसांमध्ये घडलेल्या घटना पाहता बीड हे गुन्हेगारांचं हॉटस्पॉट ठरलं आहे, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. हत्या आणि हवेत गोळीबार, या बातम्या ताज्या

▶▶ पान २ वर



# परळीत लवकरच शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय

## ना. पंकजा मुंडे यांच्या आदेशानंतर हालचाली वेगवान

बीड, (दिव्य न्युज):- परळी येथे शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी अधिकृत आदेश दिले आहेत. या महाविद्यालयासाठी आवश्यक जागेची पाहणी करण्यासाठी ▶▶ पान २ वर




# मनोज जरांगेंनी आंदोलनाची दिशा बदलली

## अंतरवालीत १५ फेब्रुवारीला साखळी उपोषण, मुंबईत देणार धडक

जालना, (दिव्य न्युज):- उपोषण सोडून १२-१३ दिवस झाले तरी दिलेल्या ओशासनातील एकाही ओशासनाची शासनाने पूर्तता केलेली नाही. उपोषण सोडविताना ओशासने द्यायची आणि नंतर त्याकडे दुर्लक्ष करायचे, असे शासनाचे सुरू आहे. त्यामुळे आता अंतरवाली सराटीत १५ फेब्रुवारीपासून बेमुदत साखळी उपोषण साखळी उपोषण सुरू होणार असून, त्याचे लोण राज्यभरात पसरणार आहे. आम्ही मुंबईतही आंदोलन करणार असून, त्यासाठी आझाद मैदान, शिवाजी पार्कच्या जागेची पाहणी केली जाणार असल्याचे जरांगे पाटील म्हणाले.

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी शनिवारी माध्यमांशी संवाद साधला. शिंदे समितीला मुदतवाढ द्यावी, दस्तावेज अभ्यासासाठी अभ्यासकाची नियुक्ती करावी, गॅझेट लागू करावे, एसीबीसीच्या विषयावर निर्णय घेणे अशा पाच ते सहा मागण्या तात्काळ सोडविण्याचे ओशासन मुख्यमंत्र्यांनी आ. सुरेश धस यांच्या मार्फत दिले होते. परंतु, उपोषण सोडून १२ ते १३ दिवस झाले तरी एकही मागणी मान्य केलेली नाही, असे जरांगे म्हणाले. पहिल्या कॅबिनेटमध्ये मागण्यांवर काहीही झालेल नाही आता होणाऱ्या दुसऱ्या कॅबिनेटमध्ये काय होईल हे माहिती नाही. आम्ही आमच्या मागण्यांसाठी रस्त्यावरची लढाई लढणार आहोत. परंतु, त्यापूर्वी अंतरवाली सराटीत आता साखळी उपोषण सुरू केले जाणार आहे. राज्यातील गावा-गावात हे आंदोलन उभा राहणार आहे. शांततेचे आंदोलन काय असते हे मुख्यमंत्र्यांना यावेळी पहायला मिळेल, असा इशाराही जरांगे पाटील यांनी दिला.




# दिल्लीत योगींची 'जादू' चालली

# बुलडोझरसमोर केजरी 'वॉल' 'ध्वस्त'

## अरविंद केजरीवाल अन् मनिष सिसोदियांना पराभवाचा धक्का

**दिल्ली, (वृत्तसेवा):– उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हे भाजपचे स्टार प्रचारक आहेत, फायरब्रँड नेते आहेत. ते केवळ उत्तर प्रदेशच नव्हे, तर देशातील इतर राज्यांतही तेवढेच लोकप्रिय आहेत. याची प्रचिती अनेक निवडणुकांमधून आली आहे. मग ती महाराष्ट्र विधानसभा निवडणूक असो किंवा हरियाणा विधानसभा निवडणूक. मुख्यमंत्री योगींनी प्रचार केलेल्या बहुतेक जागा भाजपने जिंकल्या आहेत. आता यात आणखी एक नाव जोडले गेले आहे. ते म्हणजे दिल्ली.मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दिल्ली विधानसभा निवडणुकीतही जोरदार प्रचार केला. त्यांनी येथे सुमारे १४ विधानसभा जागांसाठी सभा घेतल्या. यांपैकी भाजपने ११ जागा जिंकल्या आहेत. आतापर्यंत हाती आलेल्या निकालांत भारतीय जनता पक्ष दिल्लीत सरकार स्थापन करताना दिसत आहे.**



दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाला धक्क्यावर धक्के बसत आहेत. आम आदमी पक्षाचे मुख्य नेते आणि माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा पराभव झाला आहे. भाजपचे परवेश वर्मा यांनी अरविंद केजरीवाल यांच्यावर मात केली. अरविंद केजरीवाल यांचा जवळपास १२०० मतांनी पराभव झाला. याआधीच आम आदमी पक्षाचे नेते आणि माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांचाही पराभव झाला. याशिवाय दिल्लीच्या विद्यमान मुख्यमंत्री आतिशी मार्लेना विजयी झाल्या आहेत. तर, जंगपुरा विधानसभा मतदारसंघात आम आदमी पक्षाने माजी उपमुख्यमंत्री आणि शिक्षणमंत्री मनीष सिसोदिया यांना उमेदवारी दिली होती. तर भाजपकडून तरविंदर सिंग मारवाह आणि काँग्रेसकडून फरहाद सुरी निवडणूक रिंगणात उतरले होते. मनीष सिसोदिया हे पहिल्यांदाच जंगपुरा येथून मैदानात उतरले होते. याआधी ते पटपडगंजमधून निवडणूक लढवत होते. यावेळी पक्षाने शिक्षणतज्ज्ञ अवध ओझा यांना पटपडगंजमधून उमेदवारी दिली होती. जंगपुरा मतदारसंघातून आम आदमी पक्षाचे उमेदवार मनीष सिसोदिया यांचा पराभव झाला आहे. या जागेवर भाजपचे तरविंदर सिंग मारवाह यांनी १८४४ मतांनी विजय मिळवला आहे. दरम्यान, सध्याच्या कलानुसार भाजपने दिल्लीत जोरदार मुसंडी मारल्याचे चित्र आये . आपचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांच्या हातातून दिल्ली निसटल्याचे चिन्ह दिसत आहे. सध्या दिल्लीत भाजपची स्पष्ट बहुमताच्या दिशेने वाटचाल करत आहे. दिल्लीत दुपारपर्यंत भाजप ४८, आप २२ जागांवर आघाडीवर असल्याचे पाहायला मिळत आहे. तर काँग्रेस एकाही जागेवर आघाडीवर नाही. त्यामुळे दिल्लीत आपला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे.

### माजी सीएम अरविंद केजरीवालांच्या झाडूच्या काड्या पार इस्कटल्या, पण सीएम आतिशींनी पक्षाची लाज राखली

राजधानी नवी दिल्लीत २७ वर्षांनंतर भाजप दिल्लीत पुनरागमन करत आहे. भाजपने निर्णायक आघाडी घेतली आहे. आम आदमी पक्षाची वाताहत झाली असून दिग्गज नेत्यांना पराभव स्वीकारावा लागला आहे. माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया, सत्येंद्र जैन आदी नेते पराभूत झाल्याने आपच्या दिल्लीतील अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दुसरीकडे, मुख्यमंत्री आतिशी यांनी विजय खेचून आणत पक्षाची लाज राखली आहे. मुख्यमंत्री आतिशी यांनी कालकाजी मतदारसंघातून निवडणूक जिंकली आहे. अरविंद केजरीवाल नवी दिल्लीतून तर सिसोदिया जंगपुरा मतदारसंघातून निवडणूक हरले. सोमनाथ भारती आणि सौरभ भारद्वाज पिछाडीवर आहेत.गेल्या निवडणुकीच्या (२०२०) तुलनेत भाजपने ९ टक्क्यांपेक्षा जास्त मतांची वाढ केली. त्याच वेळी, आपचे १० टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाले आहे. काँग्रेसला एकही जागा मिळू शकली नसली तरी त्यांनी मतसंख्या २ टक्क्यांनी वाढवली आहे.

## माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल पराभूत

दिल्लीत काही दिवसांपूर्वी अमित शाह यांनी अरविंद केजरीवाल त्यांच्या मतदारसंघात पराभूत होत आहेत अशी भविष्यवाणी केली होती. ती आज खरी ठरली आहे. नवी दिल्ली मतदारसंघातून कधी आघाडीवर कधी पिछाडीवर असा पाठशिवणीचा रंगलेला खेळ आता संपला आहे. अरविंद केजरीवाल हे पराभूत झाले आहेत. भाजपाच्या प्रवेश वर्मा यांनी केजरीवालांना ३१८६ मतांनी पराभूत केले आहे. आम आदमी पक्षाचे ज्येष्ठ नेते मनीष सिसोदिया जंगपुरा मतदारसंघातून सुमारे ६०० मतांनी पराभूत झाले आहेत. राजेंद्र नगर मतदारसंघातून आपचे दुर्गेश पाठक यांचाही पराभव झाला आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीची मतमोजणी सकाळी ८ वाजल्यापासून सुरू आहे. भाजपला बहुमत मिळत आहे. काँग्रेसला भोपळा मिळाला आहे. वेगवेगळे लढण्याची खुमखुमी काँग्रेस आणि आपला नडली असली तरी केजरीवालांचे एकेकाळचे सहकारी अण्णा हजारे यांची बोलकी प्रतिक्रिया आली आहे. दिल्ली निकालावर अण्णा हजारे यांनी केजरीवालांना दारू घोटाळ्याने बुडविले, असे म्हटले आहे. काही दिवसांपूर्वीच हजारेंनी केजरीवालांना स्वार्थी म्हटले होते. अरविंद केजरीवाल पूर्वी तो चांगला होता म्हणून माझ्यासोबत होता. मात्र ज्या दिवशी राजकारण आणि पार्टीच्या नादात अरविंद केजरीवाल स्वार्थी झाला, तेव्हाच त्याच्यापासून मी दूर झालो, या शब्दांत अण्णा हजारे यांनी निशाणा साधला होता. तेव्हा त्याची नियत साफ होती. तेव्हा मला वाटले की, हा एक चांगला कार्यकर्ता आहे. त्यामुळे मी त्याला सोबत घेतले होते, असे हजारे म्हणाले होते.

# शिक्षकाने ९ वर्षीय विद्यार्थ्याला केली अमानुष मारहाण; गुन्हा दाखल

परळी , (दिव्य न्युज):–शहरातील एका प्राथमिक शाळेतील शिक्षकाने विद्यार्थ्यावर अमानुष मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी शिक्षकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रोहिनी दिलीप भंडारे (वय ६३, रा. हिंदनगर, परळी) यांनी परळी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा ९ वर्षीय नातू यश स्वानंद भंडारे, जो भेल सेकंडरी स्कूलमध्ये चौथीमध्ये शिक्षण घेत आहे, त्याला शाळेतील क्रीडा शिक्षक कावरे सर यांनी निर्दयपणे मारहाण केली. शुक्रवारी (७ फेब्रुवारी) सकाळी ९.१५ वाजताच्या सुमारास, शाळेतील प्रार्थना संपल्यानंतर यश वर्गात जात असताना कावरे सर यांनी त्याला अडवले. तुझ्या आजीने पोलीस स्टेशनमध्ये माझ्यावर केस का केली? असे विचारत त्यांनी रागाच्या भरात यशच्या पाठीच्या मनक्यावर जाड लाकडी पट्टीने जोरात मारले. त्यामुळे त्याच्या पाठीवर गंभीर व्रण उठले. जेव्हा यश दुपारी २ वाजता घरी परतला, तेव्हा तो रडत होता. आजीने विचारले असता, त्याने संपूर्ण प्रकार सांगितला. त्यानंतर त्यांनी तातडीने यशला घेऊन संभाजीनगर पोलीस स्टेशन, परळी वैजनाथ येथे धाव घेतली. पोलिसांनी तक्रार नोंदवून यशला वैद्यकीय तपासणीसाठी सरकारी रुग्णालयात पाठवले. सदर फिर्यादीवरून त्या शिक्षकावर संभाजीनगर पोलीस ठाण्यात बाल अधिनियमान्वाये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अनिल शिंदे करत आहेत.

# उद्धव ठाकरे महाविकास आघाडीतून बाहेर पडणार?

## संजय राऊत यांनी दिले संकेत

**मुंबई, (दिव्य न्युज):– शिवसेना नेते उद्धव ठाकरे यांनी दिल्लीतील आपच्या पराभवानंतर चिंता व्यक्त केली आहे. त्यामुळे आता उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीत रहायचे नाही यावर आता पक्षाच्या इतर नेत्यांशी बोलून एकत्र काम करायचे का नाही याचा विचार करावा लागेल असे ठाकरे यांनी आपल्याशी चर्चा करताना म्हटल्याचे शिवसेना नेते संजय राऊत यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले आहे.त्यामुळे उद्धव ठाकरे हे महाविकास आघाडीतून बाहेर पडणार असल्याचे म्हटले जात आहे.**



दिल्लीत आपचा मोठा पराभव झाला आहे. आप आणि काँग्रेस स्वतंत्र लढल्याने हा पराभव झाल्याचे म्हटले जात आहे. या प्रकरणात काश्मीरचे नॅशनल कॉन्फरन्सचे नेते कश्मीर नेते उमर अब्दुल्ला यांनी दिल्लीतील आपच्या पराभवानंतर अजून भांडत बसा असा टोमणा काँग्रेस पक्षाचे नेते राहूल गांधी यांना लगावला आहे. त्यानंतर आता शिवसेना नेते उद्धव ठाकरे यांनी देखील इंडिया आघाडीच्या या कामगिरीवर नाराजी व्यक्त केली असे संजय राऊत म्हणाले.

केजरीवाल यांना जनतेने १० वर्ष निवडून दिल आहे. भ्रष्टाचार विरोधी आंदोलनातून आलेला एका पक्षाने सत्ता घेतली. मतदार याद्यातून हजारो नाव गायब केली आहेत.दिल्लीतील रिकामे बंगले आहेत त्यात कोणी राहत नाही त्यांचे नाव नोंदवले आहे. केजरीवाल हरले.या पराभवाचं मुख्य कारण काँग्रेस आणि आप वेगवेगळे लढले आहे. आमच्या इंडिया ब्लॉक मधील दोन पक्ष एकत्र आले असते तर निकाल वेगळा लागला आसता. फरक फार मोठा नाही असे उद्धव ठाकरे यांनी म्हटल्याचे संजय राऊत यांनी सांगितले.

राहुल गांधी यांच्यासोबत असताना मी काल सांगितलं, महाराष्ट्र पॅटर्न दिल्लीत राबवला. जसा लातूर पॅटर्न राबवला तसा राबवला.आता लातूर पॅटर्न कुठे आहे, राजकारणात 'अघोरी पॅटर्न' काही काळ चालतो. महाकुंभमध्ये मोदी गेले, तसेच कन्याकुमारी कुठे कुठे जातात मतदानाच्या दिवशी जातात, मी किती कडवट हिंदू आहे हे दाखवायचा प्रयत्न आहे. धर्माची अफूची गोळी द्यायची असा प्रकार सुरु आहे असेही संजय राऊत म्हणाले.

# वादातून आईनेच घोटला दोन चिमुकल्यांचा गळा

## पतीवरही केले कोयत्याने वार

दौंड, (दिव्य न्युज):- पती–पत्नीमध्ये झालेल्या घरगुती वादातून रागाच्या भरात आईने दोन चिमुकल्यांचा गळा दाबून मारले. तसेच झोपेत असलेल्या पतीवर कोयत्याने वार करत स्वत: पेटवून घेण्याचा प्रयत्न केला. ही घटना स्वामी चिंचोली (ता. दौंड) येथे शनिवारी पहाटे घडली असून, पतीला बारामती येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसर हादरून गेला आहे.

शंभू ऊर्फ हर्ष दुर्योधन मिंढे (३), पियू दुर्योधन मिंढे (१) अशी या चिमुकल्यांची नावे आहेत, तर पती दुर्योधन आबा मिंढे (३५) हे गंभीर जखमी झाले आहेत. याप्रकरणी दौंड पोलिसांनी पत्नी कोमल दुर्योधन मिंढे (३०) हिला ताब्यात घेतले आहे.पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, दुर्योधन मिंढे हे आयटी कंपनीमध्ये स्वॉफ्टवेअर इंजिनिअर आहेत. मात्र, दोन वर्षांपासून घरूनच वर्कफ्रॉम होम करत होते, तर कोमल हीदेखील बीएस्सी केमिस्ट्री झालेली आहे. दोघांमध्ये नेहमीच वाद होत होते. शुक्रवारी रात्रीही पती–पत्नीमध्ये वाद झाला होता. त्यानंतर बेडरूममध्ये कोमल आणि तिची चिमुकली मुलगी पीयू झोपलेली होती. सर्वप्रथम तिने मुलीचा गळा आवळून खून केला. त्यानंतर अन्य एका खोलीत आजीजवळ मुलगा शंभू झोपलेला होता. या मुलाला उचलून तिने बेडरूममध्ये आणले आणि त्याचाही गळा आवळून खून केला.त्यानंतर बाहेरच्या खोलीत झोपलेल्या नवऱ्याचा खून करण्याच्या मानसिकतेतून तिने त्याच्यावर कोयत्याने वार केला. यावेळी नवऱ्याने आरडाओरड केल्याने कोमल धावत आपल्या बेडरूममध्ये आली. तिने दरवाजा बंद करून घरातील चाकूने हाताच्या नस तोडण्याचा प्रयत्न केला. परंतु यावेळी घरातील लोकांनी दरवाज्याला धक्का दिल्याने दरवाजा उघडला आणि कोमल आत्महत्या करीत असताना तिला घरातील लोकांनी सावरले. मात्र यावेळी दोन चिमुकल्यांचा प्राण गेलेला होता.

पान १ वरून

### आ.संदीप क्षीरसागर

केली. यावेळी उपस्थित नागरिकांशी संवाद साधला.सध्या बीड शहरातील शाहूनगरमधील आदर्श नगर भागात सिमेंट रस्ता कामासह विकासकामांची पाहणी केली. यावेळी उपस्थित नागरिकांशी विविध विषयांवर आ.संदीप क्षीरसागर यांनी चर्चा केली. बीड शहरासह मतदारसंघातील विकास कामांचा वेग यापुढेही असाच कायम ठेवला जाईल अशी ग्वाही त्यांनी याप्रसंगी दिली.

### आ.नमिता मुंदडा

नोटिफिकेशन काढले नाही. ईव्हीएम (मतदान यंत्र) द्वारे निवडणूक घेतली म्हणून लोकप्रतिनिधित्व कायद्याचे कलम ५९ आणि ६१ यांचे उल्लंघन झाले आहे. कलम ५९ मध्ये निवडणुकीत मतदान करण्याची पद्धती ही मतपत्रिकेद्वारे मतदान केले जाईल, याबाबतीत आहे.

सदरील निवडणूक याचिकेत पुढे असे नमूद करण्यात आले आहे की, निवडणुकीत वापरण्यात आलेले ईव्हीएम तसेच व्हीव्हीपॅट मशीन यांना अनुक्रमांक देताना कायदेशीर तरतुदींचे पालन केलेले नाही. ईव्हीएम मशीन तसेच बॅलेट युनिट्स आणि व्हीव्हीपॅटचे प्रिंटर्स यांना कायमस्वरूपी अनुक्रमांक न देता त्यावर स्टीकर लावण्यात आले होते. त्यामुळे ईव्हीएम मशीनची सुरक्षितता संशयास्पद असल्याने निवडणुकीचा निकाल प्रभावित झालेला आहे. निवडणूक अधिकाऱ्यांनी ईव्हीएम मशीनवरील सीलवर स्वत: स्वाक्षरी केलेली नाही. म्हणून संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ चे कलम १०० मधील ड (४) नुसार राज्यघटनेचे तसेच त्यामधील तरतुदी आणि नियमांचे व आदेशांचे अनुपालन न केल्यामुळे निवडणुकीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे मुंदडा यांची निवडणूक रद्दबातल घोषित करण्याची विनंती केली आहे. सुनावणीनंतर मुंदडा यांच्यासह २३ उमेदवार व निवडणूक आयोगास नोटीस बजावण्याचे आदेश खंडपीठाने दिले आहेत. पुढील सुनावणी २४ फेब्रुवारी रोजी आहे. अर्जदारातर्फे ड. रवींद्र गोरे, ड. सुस्मिता दौंड काम पाहत आहेत.

### मांजरसुंब्याजवळ

ते पाटोदा दरम्यान मुळुकवाडी येथे भिषण अपघात झाला या अपघातात दोन जागीच ठार आणि दोन गंभीर जखमी जेजुरी वरून देवदर्शन करून गावी सोनपेठ कडे जात असताना मुळुकवाडी येथील पुलावर गाडी आदळल्याने गाडीचा चकनाचुर झाला.वाहन क्रमांक चक२२ अच ४५७१ या वाहानाने मुळकवाडी जवळील पूलाला जोराची धडक दिल्याने हा अपघात झाल्याचे समजते पूणाला धडक देताच गाडीचे टायर निखळुन पडले.अपघाताचा आवाज ऐकून ग्रामस्थांनी जखमींना बीड जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून मृतांची जखमीची नावे समजू शकली नाही.

### पेठ बीड भागातील

सलीम जहाँगिर यांनी नागरीकांसह वीज कंपनीचे कार्यकारी अभियंता अविनाश सानप यांची भेट घेऊन हे प्रश्न तात्काळ सोडविण्याची मागणी केली.

बीड शहरातील पेठ बीड हद्दीतील खुबा कॉलनी, तेलगाव रोड यासह इतर भागांमध्ये वारंवार वीजेची समस्या निर्माण होऊ लागली आहे. खुबा कॉलनीतील डीपी सध्या २०० के.वी.ची आहे. मात्र त्यावर ३०० के.वी.चा लोड असल्याने वारंवार वीज पुरवठा खंडीत होऊ लागला आहे. सदरील डीपी तात्काळ बदलून त्या ठिकाणी ३०० के.वी.ची डीपी बसवावी. लोंबकळलेल्या तारा दुरूस्त कराव्यात, कुचकामी तारा आणि विद्युत पोल तात्काळ बदलण्यात यावेत अशी मागणी यावेळी सलीम जहाँगिर यांनी केली. यावेळी कार्यकारी अभियंता अविनाश सानप यांनी पेठ बीड भागातील शाखा ३ चे इंजि.उमेश कसबे यांना बोलावून या समस्या तात्काळ मार्गी लावण्याच्या सुचना केल्या. यावेळी गफुर पटेल, सययद चांद, इमदाद खान,अब्दुल रहेमान,शेख इस्माईल,डौलात बेग शेख तन्वीर,शेख,जावेद,शेख नदीम,शेख आसिफ, शमसोदीन शेख,शेख लाला आदिजन उपस्थीत होतें

### डोळ्यात मिरची पावडर

असतानाच आणखी एक खळबळजनक बातमी समोर येत आहे.

जुन्या वादाच्या कारणावरून डोळ्यात मिरची पावडर टाकत कात्रीनं जीवे मारण्याचा प्रयत्न केला असल्याची घटना घडली आहे. ही धक्कादायक घटना बीडच्या माजलगाव तालुक्यातील लोणगाव येथे घडली आहे. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे.गुरूवारी सायंकाळच्या सुमारास बीडच्या लोणगावात एक धक्कादायक घटना घडली आहे. जुन्या वादातून एकाने डोळ्यात मिरची पावडर टाकत केस कापण्याच्या कात्रीने जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे. तुझ्या भावाने माझ्यावर केस का केली? असा जाब विचारत डोळ्यात मिरची पावडर टाकून कात्रीनं हल्ला केला. या प्रकरणी दिंद्रुड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### परळीत लवकरच शासकीय

पशुविज्ञान विद्यापीठाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची टीम रविवारी परळीत दाखल होत आहे.

बारामती आणि परळीला नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालये नुकत्याच बारामती येथे झालेल्या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार आणि ना. पंकजा मुंडे यांनी परळी वैजनाथ आणि बारामती येथे नवीन शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार, महाविद्यालयाच्या उभारणीसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सोयी–सुविधांचे निरीक्षण आणि भारतीय पशू चिकित्सा परिषद, नवी दिल्लीच्या मानकांनुसार आवश्यक बाबींचे मूल्यमापन करण्यासाठी विद्यापीठ स्तरिय निरीक्षण समिती गठीत करण्यात आली आहे.

रविवारी होणार जागेची पाहणी

या समितीचे अध्यक्ष तसेच पशुविज्ञान विद्यापीठाचे डीन डॉ. एस. व्ही. उपाध्ये, डॉ. जी. एस. खांडेकर, कनिष्ठ अभियंता डॉ. पी. व्ही. तायडे आणि तांत्रिक अधिकारी डॉ. पी. ई. ताकसांडे रविवारी परळीत जागेची पाहणी करणार आहेत. या वेळी बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक तसेच संबंधित अधिकारी उपस्थित राहणार आहेत. या निरीक्षणानंतर महाविद्यालयासाठी अंतिम जागा निश्चित केली जाणार आहे.

ना. पंकजा मुंडे यांनी घेतला आढावा

शुक्रवारी बीड जिल्हाधिकारी कार्यालयात ना. पंकजा मुंडे यांनी पर्यावरण आणि परळीतील नव्या पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणीसंदर्भात आढावा बैठक घेतली. यामध्ये अधिकाऱ्यांशी चर्चा करून नियोजित कामांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला.लवकरच या महाविद्यालयाच्या उभारणीच्या कामाला गती मिळणार असून, परळीतील विद्यार्थ्यांसाठी आणि पशुसंवर्धन क्षेत्रासाठी ही मोठी संधी ठरणार आहे.